# पनवेल महानगरपालिका
# पशुवैद्यकीय विभाग

## जाहीर सूचना

पशुधन विकास अधिकारी, पनवेल महानगरपालिका खाली नमुद कामाकरिता योग्य त्या वर्गात जाहीर निविदा मागवित आहेत.

| अ. क्रं. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. | बयाणा रक्कम | निविदा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका अंतर्गत प्राण्यांच्या शस्त्रक्रियेकरिता पोदी येथील ऑपरेशन थिएटरचे नुतनीकरण करणेबाबत. | ९,५५,८००/- | रू.१०,०००/- | रू. २३६०/- (१८% GST सह) |

याकामी दरपत्रके दि.११.०७.२०२५ पासुन दि.२१.०७.२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत पशुवैद्यकीय विभागात सादर करावीत.

१. दरपत्रक सिलबंद पाकीटमध्ये घालुन दि.२१.०७.२०२५ दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पशुवैद्यकीय विभागात स्विकारण्यात येतील.
२. सिलबंद दरपत्रकावर कामगिरिच्या नावाचा उल्लेख करण्यात यावा.
३. प्राप्त झालेली दरपत्रके दि.२२.०७.२०२५ दिवशी ११.०० वाजता पशूवैद्यकीय विभागामध्ये उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
४. अटी व शर्ती युक्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
५. कामाची देयके निधी उपलब्धतेनुसार अदा करण्यात येतील.

प्राप्त दरपत्रकातील १ अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता मंजुर अथवा ना मंजुर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

जा.क्र.पमपा/पशुवैद्यकीय सेवा/ ७४८ /२०२५-२६
दिनांक:- ११ /०७/२०२५

# पनवेल महानगरपालिका

## पशुवैद्यकीय विभाग

# निविदा

पमपा/पशुवैद्यकीय विभाग/ ०२ /२०२५-२६ दिनांक: ११ /०७/२०२५

**कामाचे नाव: पनवेल महानगरपालिका अंतर्गत प्राण्यांच्या शस्त्रक्रियेकरिता ऑपरेशन थिएटर नुतनीकरण करणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| Livestock Devlopment Officer<br>Panvel Municipal Corporation | Veterinary Officer<br>Panvel Municipal Corporation | Medical Health Officer<br>Panvel Municipal Corporation |
| Deputy Commissioner<br>Panvel Municipal Corporation | Chief Account Officer<br>Panvel Municipal Corporation | Chief Auditor<br>Panvel Municipal Corporation |

Additional Commissioner
Panvel Municipal Corporation

# पनवेल महानगरपालिका

# निविदा अटी व शर्ती

**कामाचे नाव: पनवेल महानगरपालिका अंतर्गत प्राण्यांच्या शस्त्रक्रियेकरिता ऑपरेशन थिएटर नुतनीकरण करणेबाबत.**

निविदा क्र. पमपा/पशुवैद्यकीय विभाग/ ०२ /२०२५-२०२६

**अ. आवश्यक पात्रता:-**

१. निविदाधारककाकडे महानगरपालिका अथवा कोणताही शासकीय कार्यालयात प्राण्यांच्या शस्त्रक्रियेकरिता ऑपरेशन थिएटर नुतनीकरण करणेकामी कामाचा मागील ०३ वर्षामध्ये किमान ०१ कामाचा कामपुर्णत्वाचा किंवा अनुभवाचा दाखला.

२. GST प्रत व पॅन कार्ड प्रत असणे आवश्यक.

३. निविदाधारक काळ्या यादीमध्ये दाखल नसलेबाबत स्वयंघोषणापत्र.

**ब. निविदा अटी व शर्ती**

१. पनवेल महानगरपालिका अंतर्गत प्राण्यांच्या शस्त्रक्रियेकरिता ऑपरेशन थिएटर नुतनीकरण करणे या कामासाठी निविदा दर मागविण्यात येत आहे.

२. निविदाधारकाने सदरकामी ५% सुरक्षा अनामत भरणे बंधनकारक राहील (२% प्रारंभीक सुरक्षा अनामत व ३% चालू देयकातून कपात करण्यात येईल.)

३. महानगरपालिका मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही याची खबरदारी घेणे बंधनकारक राहील.

४. निविदाधारकाने महानगरपालिकेस नुतनीकरणाचे खालील प्रमाणे पुरवायचे आहेत.

५. संबंधीत निविदाधारकाने आवश्यक साहीत्य या साठी लागणारा खर्च या सर्व बाबींचा विचार करुनच दर सादर करायचे आहेत.

६. निविदाधारकाने साहित्य पुरविल्यानंतर पुढील ०१ वर्षात दुरुस्ती आढळल्यास सदर दुरुस्ती निविदाधारकाने स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.

७. निविदाकाराने निविदा सादर केलेल्या दरा व्यतिरिक्त GST वगळून इतर कोणतेही शासकीय दर/कर / इतर भत्ते महापालिका देय असणार नाही.

८. निविदाकाराने महापालिकेबरोबर ठरवुन दिलेल्या कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क कायत तरतुदीनुसार स्टंप पेपरवर त्वरीत करुन द्यावा लागेल. त्यानंतरच कार्यदिश देण्यात येईल करारनाम्यातील अटी व शर्ती संबंधितांवर बंधनकारक राहतील.

९. बालमजुर कायदा, पर्यावरण कायदा १९८६ नियमांचे पालन करणे निविदाकारावर बंधनकारक आन व कोणत्याही कारणास्तव प्रकरण न्याय प्रविष्ट झाल्यास मा. न्यायालय पनवेल क्षेत्र न्यायालय राहील.

१०. निविदेसंबंधि काही वाद निर्माण झाल्यास सदरचा वाद लवादामार्फत सोडविण्यात येईल तसेच सदर लवादासाठी एक व्यक्तीची सदरचा वाद मिटविण्यासाठी नेमणुक दोन्ही पक्षकारांच्या संमतीने करण्यात येईल. सदर लवादीची प्रक्रीया (Arbitation Act) नुसार करण्यात येईल.

११. सर्व शासकीय विविध कर भरण्याची जबाबदारी निविदाकारावर राहील.

१२. निविदाकारा समवेत महानगरपालिकेने केलेल्या करारनामा / कार्यादेशाची मुदत ०१ महिना असेल. सबळ कारणासह मुदतीत वाढ करण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्त यांनी राखून ठेवला आहे

१३. कालावधीतील कामाबाबत कोणताही लेखा आक्षेप आल्यास वसुली निघाल्यास त्याची पूर्तता करणे निविदाकारावर बंधनकारक राहील.

१४. कंत्राटदराने निविदेतील दर हे सर्व पुरवठ्याच्या प्रमाणाचा विचारकरुण सादर करणे बंधनकारक राहील.

१५. विभागाने निर्धारित केलेल्या निश्चित परिमाणाशी आलेल्या बाबनिहाय दरांचा एकत्रित घोषवारा तयार करुन त्या आधारे L1 निश्चित करण्यात येईल.

१६. कंत्राटदाराने निविदेतील दर हे जी.एस.टी. सह भरणेचे आहेत.

१७. वरील अटी व शर्तीमध्ये कोणत्याही प्रकारचे बदल करण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहतील.

क. दंड (Penalty Clause)

१. निविदाधारकाने दिलेले काम विहित वेळमर्यादमध्ये न केल्यास, आवश्यक साहित्य / आवश्यक नग न पुरविल्यास, साहित्यांचा गुणवत्ता योग्य नसल्यास सदर वस्तूच्या किंमतीच्या दीडपट दंड आकारण्यात येईल.

२. निविदाकाराने काम समाधानकारक न केल्यास किंवा काम मध्येच सोडल्यास दंड आकारण्यात येईल. तसेच कार्यादेश व करारनामा रद्द करण्यात येईल व द्वितीय लघुतम दराच्या निविदारास कंत्राट दिल्यास येणा-या मुळ फरकाची रक्कम प्रथम निविदाकारकडुन वसुल करण्यात येईल.

३. निविदाकाराचे कामाबाबत अनियमितता अथवा काम समाधानकारक न आढलल्यास सात दिवसाची लेखी नोटीस देऊन त्याचे कंत्राट रद्द करण्यात येईल. व निविदाकाराने जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल व कंत्राटदारास काळया यादीत टाकण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल.

वैद्यविद्या

उपायुक्त (आरोग्य)
पनवेल महानगरपालिका